# आदेश

महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२,
दिनांक : ६ मे, २००२

**मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८**

क्रमांक मुद्रांक २००२/८७५/प्र.क्र.१७३/म-१ . मुंबई मुद्रांक अधिनियम,१९५८ (१९५८ चा ६०) (यानंतर ज्याचा उल्लेख " उक्त अधिनियम" असा करण्यात येईल.) च्या कलम-९ पोट कलम- (अ) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र शासन याद्वारे दिनांक १ मे,२००२ पासून उक्त अधिनियमाच्या अनुसूची एक मधील अनुच्छेद ६ च्या खंड (२) अन्वये तारणगहाण, हडपतारण अथवा वचनपत्र यावर देय असलेल्या मुद्रांक शुल्काचा दर यासोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्टामधील स्तंभ २ मधील प्रयोजनासाठी असे दस्त निष्पादीत करण्यात येत असतील तेव्हा त्या समोरील स्तंभ (३) मधील मर्यादेपर्यंत कमी करीत आहे.

स्पष्टीकरणः- जेव्हा पूर्वीच्याच रकमेचे कर्ज पूर्वीच्याच प्रयोजनासाठी व पूर्वीच्याच कर्जदारास चालू ठेवून त्या कर्जाच्या परतफेडीची प्रतिभूती म्हणून पूर्वीच्या तारणगहाण, हडपतारण अथवा वचनपत्राच्या दस्ताचे नुतनीकरणाचा करार करण्याऐवजी असे नवीन दस्त निष्पादीत करण्यात येत असतील तर अशा नवीन दस्तावर अनुच्छेद ५ चा खंड (ह) नुसार मुद्रांक शुल्क देय असेल.

## परिशिष्ट

| अ.क्र. | प्रयोजन | कमी केलेला दर |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | रु.५,००,००० पर्यंतच्या कर्जाच्या अग्रीम धनाच्या परतफेडीची प्रतिभूती. | रु.१,००,०००/- अथवा त्याच्या भागास रु.१००/- |
| २ | रु.५,००,००० पेक्षा जास्तीच्या रकमेच्या कर्जाच्या अग्रीम धनाच्या परतफेडीची प्रतिभूती | रु.५००+ रु.५,००,०००/- लाखाच्या वरील प्रत्येक रु.१,००,०००/- अथवा त्याच्या भागास रु.२५०/- |
| ३ | परदेशात माल निर्यात करण्यासाठी देण्यात येणा-या कर्जाच्या अग्रीमधनाच्या परतफेडीची प्रतिभूती. | रु.१,००,०००/- अथवा त्याच्या भागास रु.१००/- |
| ४ | पूर्वी संबंधित दस्त करुन प्रतिभूती केलेल्या रकमेपेक्षा अधिक रकमेच्या कर्जाच्या अग्रीम धनाच्या परत फेडीची प्रतिभूती | वरील क्र.१,२,३ यथास्थितीप्रमाणे देय असलेल्या मुद्रांक शुल्काची रक्कम उणे पूर्वीच्या अशा दस्तांवर अदा केलेल्या मुद्रांक शुल्काची रक्कम |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( रमाकान्त असमर )
शासनाचे सहसचिव.

# ORDER

Revenue and Forests Department,
Mantralaya, Mumbai - 400 032.
Dated : 6th May, 2002.

Bombay Stamp Act, 1958.

MUDRANK-2002/875/CR 173/M-I,- In exercise of the powers conferred by clause (a) of section 9 by the Bombay Stamp Act, 1958 (Bom.LX of 1958) (hereinafter referred to as "the said Act"), the Government of Maharashtra hereby reduces, with effect from 1st May, 2002, the Stamp Duty chargeable on the Instruments of Hypothecation, Pawn or Pleadge under clause (2) of Article 6 in Schedule I appended to the said Act for the purposes mentioned in column (2) of the Annexure appended to this Order to the extent specified against each of them in column **(3)** of the said Annexure.

**Explanation :-** Where a fresh Instrument of Hypothecation, Pawn or Pleadge is executed for securing repayment of money already advanced, by way of loan, between the same parties and for the same purpose and for the same amount and the Stamp Duty in respect of earlier instrument has already been paid, then the stamp duty chargeable on such fresh instrument shall be as is payable under clause (h) of Article (5) in the Schedule I to the said Act.

**Annexure**

| Sr.No. (1) | Purpose (2) | Reduced Rate (3) |
|---|---|---|
| 1 | Securing repayment of money advanced or to be advanced by way of loan upto Rupees 5,00,000. | One hundred rupees for every rupees 1.00.000 or part thereof. |
| 2 | Securing repayment of money advanced or to be advanced by way of loan of more Rs.5,00,000. | Rupees 500 plus two hundred and fifty rupees for every rupees 1,00,000 or part thereof of the amount in excess of Rs.5,00,000. |

| | | |
|---|---|---|
| **3** | Securing repayment of money advanced or to be advanced by way of loan or an existing or future debt for export of goods to foreign countries. | One hundred rupees for every rupees 1,00,000 or part thereof. |
| 4 | Securing repayment of money advanced or to be advanced by way of loan or an existing or future debt of an higher amount than one secured by earlier instruments of like nature. | Same duty as is payable under entry 1.2 or **3** above less the amount of duty paid on earlier instrument of like nature. |

By Order and in the name of Governor of Maharashtra,

( **RAMAKANT ASMAR** )
**Joint Secretary to Government.**